# गजाआडच्या कविता



४

संपादन - उत्तम कांबळे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

गजाआडच्या कविता



# गजाआडच्या कविता

संपादक : उत्तम कांबळे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

गजाआडच्या कविता

* प्रथमावृत्ती : २७ फेब्रुवारी २००२

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

मुखपृष्ठ व रेखाटने : धनंजय गोवर्धने, नाशिक

किंमत : रु. ३०/-

तुरुंगातील कैद्यांच्या कविता
समाजासमोर याव्यात
असे सातत्याने सांगणाऱ्या
आणि या काव्यसंग्रहामागची
प्रेरणा असणाऱ्या
कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांना
सादर अर्पण...

— उत्तम कांबळे

# मनोगत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर काही वेगळ्या वाटा धुंडाळण्याचा माझा प्रयत्न राहिलेला असून या प्रयत्नांचे एक फलीत म्हणजेच मंडळाच्या वतीने प्रकाशित होत असलेल्या 'गजाआडच्या कविता' हा कवितासंग्रह होय.

श्री. उत्तम कांबळे हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सन्माननीय सदस्य. माझ्याशी बोलताना त्यांनी एकदा महाराष्ट्रातल्या तुरुंगातील काही कैदी उत्कृष्ट काव्यनिर्मिती करीत असल्याचे व या कवींच्या कवितांचा एक संग्रह मंडळाच्या वतीने प्रकाशित व्हावा, अशी आपली इच्छा असल्याचे मला बोलून दाखविले. तुरुंगातल्या कैद्यांच्या कविता खरोखरच प्रकाशनयोग्य असतील तर आपण असा कवितासंग्रह अवश्य प्रकाशित करू, असे मी त्याच क्षणी त्यांना आश्वासन दिले. 'गजाआडच्या कविता' हा कवितासंग्रह प्रकाशित करून त्यांना दिलेल्या आश्वासनाची मला पूर्तता करता आली, याचा मला विशेष आनंद होत आहे.

काळ्याभिन्न दगडांच्या
भिंतीत कोंबलेला माणूस

- हितेश शहा

नातीगोती सर्व काही
इथं विसरून जायचे
फक्त आणि फक्त
गगनच पहायचे.

- रमेश बाबूराव खाडे

असे भोग नशिबी बांधलेला माणूस,

इथं विदीर्ण काळीज
शून्य नजरा
हळवी मनं

भुकेल्या आहेत आर्त स्वरांच्या हाकेला

अशी अवस्था असलेला माणूस,

तुझ्या एका नकारात
आयुष्य उद्ध्वस्त करणारा सुरुंग आहे
आता मी एक कैदी
उर्वरित आयुष्य तुरुंग आहे

असे आपल्या गजाआडचं कारण प्रामाणिकपणे नमूद करणारा माणूस एवढी सकस, एवढी समर्थ कविता लिहीत असेल असे कुणालाही वाटणे शक्य नाही. जिथं मन मारून जगावं लागतं तिथं संवेदना जोपासणं अशक्य असतं. पण तुरुंगातल्या या कैद्यांनी ही संवेदना जोपासलेली आहे. अर्थात ही संवेदना ते का जोपासू शकले याचाही विचार व्हावयास हवा. ती कारणेदेखील स्पष्ट व्हावयास हवीत. ती कारणे तुरुंगाविषयीच्या बदलत्या संकल्पनेत असण्याची शक्यता आहे. हे कैदी शरीराने गजाआड असले तरी मनानं कदाचित मुक्त असतील. कदाचित त्यांना त्यांच्या संवेदना जोपासता याव्यात असे वातावरण तिथं जाणीवपूर्वक उपलब्ध करून दिलं जात असेल. गजाआडच्या कैद्यांना सोबत घेऊन एखादा तुरुंगाधिकारी एखादे नाटक बसवितो व हे नाटक गज नसलेल्या नाट्यगृहात रसिक प्रेक्षकांसमोर सादर करतो तेव्हा तुरुंगातल्या कैद्यांची संवेदना जोपासण्याचे कार्य तुरुंगात होत नाही, असं कसं म्हणता येईल?

आयुष्य असे भिकार आहे,
अस्मितेची बात नाही,
रुसावे कुणासाठी तरी
अशी आता साथ नाही
कलम केलेल्या शरीरातून
अंकुरतील असे हात नाहीत
कुरवाळतील कधीतरी,
असे आता जजबात नाही,
अशा भणंग कैफियतेची यार हो,
ही रुजवात नाही
छेदून टाकील अंतराला
अशी आता बात नाही.

अशी गजाबाहेरच्या कवींना लाजवील अशी समर्थ कविता गजाआडचे श्री. शिवाजी साळुंके लिहितात तेव्हा माझ्या वरील विधानाचे प्रत्यंतर आल्यावाचून राहात नाही.


महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला व मराठी वाचकांना 'गजाआडच्या कविता' उपलब्ध करून देऊन श्री. उत्तम कांबळे यांनी फार मोठे ऐतिहासिक काम केलेले आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व मराठी रसिक त्यांचे कायम ऋणी तर आहेतच; पण गजाआडची ही माणसंदेखील त्यांचे कायम ऋणी राहतील.

रजेचे कागद देत सहज त्यांना विचारले
जामीनदार सदरी नाव कुणाचे लिहिले?
कागद घेतले,
नाव वाचले... विष्णु वामन शिरवाडकर
गळ्यातला गहिंवर
डोळ्यातले दहिंवर
छातीतला हुंदका दाबत
त्यांना तात्या देवाघरी गेल्याचे सांगितले
पांडुरंग,
सिद्धार्थ,
मोहन
बातमी ऐकून हबकले
बराकीच्या पायरीवर बसून
तिघेजण हमसून हमसून रडले

श्री. उत्तम कांबळे यांनी 'गजाआडच्या कविता' हा कवितासंग्रह संपादित करून या हमसून हमसून रडणाऱ्या कवींचे अश्रू पुसण्याचे काम केलेले आहे.

स्थळ : मुंबई
दिनांक : ३० जानेवारी २००२

**रा. रं. बोराडे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ



# 'गजाआड'च्या काळजात डोकावताना...

तुरुंग म्हणजे गुन्हेगारांना, कैद्यांना बंदीस्त करणारी एक चिरेबंदी इमारत. सक्तमजुरी, सश्रम कारावास, बेड्या, बराकी अशा कितीतरी गोष्टी या इमारतीच्या अंगाखांद्यावर आहेत. यातील काही गोष्टींची ओळख बाहेरच्या समाजाला वेगवेगळ्या पद्धतींनी होत असते. काहींना ती होत नसते. एकदा एखाद्याच्या कपाळावर गुन्हेगार म्हणून शिक्का बसला की, समाजाचा त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. त्याच्याकडे सदैव गुन्हेगार म्हणूनच पाहिले जाते. मुळात कोणताही माणूस पूर्णपणे गुन्हेगार नसतो. चांगला आणि वाईट याचे तो मिश्रण असतो. त्याच्यातील वाईटपणा नियंत्रणाबाहेर गेला की तो गुन्हेगार होतो. पण याचा अर्थ त्याच्यातील चांगूलपणा संपलेला असतो असे नाही. हा चांगूलपणा तो स्वत:ही जागा करतो आणि काही वेळा समाजातील चांगूलपणाच्या मदतीनेही तो जागा करत असतो. गुन्हेगारीचे उदात्तीकरण कोणत्याही परिस्थितीत कोणी करता कामा नये हे जसे खरे तसचे गुन्हेगार ही समाजाचीच निर्मिती असते. हे ही तितकेच खरे आहे. जेव्हा गुन्हेगाराचा विचार आवश्यक असतो तेव्हा स्वाभावाविकच सामाजाचा विचारही अपरिहार्य ठरतो. एक चिनी कथा आहे; एका व्यापाऱ्याच्या घरी चोरी झाली. चोरी त्याच्या घरातील नोकरानेच केल्याचे निष्पन्न झाले. मालकाने नोकराला मुद्देमालासह पकडले आणि न्यायाधीशासमोर उभे केले. नोकराने गुन्हा मान्य केला. न्यायधीशांनी दोन्ही बाजूस समजून घेऊन निकाल सांगण्यास प्रारंभ केला. ते म्हणाले, **''मित्रांनो,**

**फिर्यादीच्या नोकरानेच चोरी केली आहे याविषयी आता कसलीच शंका उरलेली नाही. साक्षी पुरावेही तेच सांगत आहेत आणि स्वत: आरोपीही गुन्हा मान्य करतो आहे. दोन्ही बाजूंचा अभ्यास करून मी असा निर्णय दतो, की फिर्यादी असलेल्या मालकाला सहा महिने तुरुंगात ठेवावे आणि आरोपीची मुक्तता करावी.''** हा विचित्र निकाल ऐकून कोणाला धक्का बसणार नाही! फिर्यादीलाही तो बसला. तो म्हणाला, **''न्यायाधीश महाराज कृपा करुन आपण आपल्या निकालाचा पुन्हा एकदा विचार करावा. आपल्याला आरोपीलाच शिक्षा सुनवायची असेल पण आपण चुकून फिर्यादीला शिक्षा असे म्हणाला असाल. महाराज दयाळू अंत:करणाने आपण आपल्या निकालाकडे पाहावे आणि चूक दुरूस्त करावी.''**

न्यायाधीश गंभीरपणे म्हणाले. **''नाही मित्रा, मी निकाल सांगताना कसलीही चूक केलेली नाही. शब्दांची गल्लत केलेली नाही. चोर पकडून आणलेल्या फिर्यादिलाच मी शिक्षा सुनावली आहे आणि आरोपीला निर्दोष सोडले आहे. मी चूक केलेली नाही. नोकराने मालकाच्या घरात चोरी केली आहे हे तर स्पष्टच झाले आहे. माझ्या मते चोर जन्माला घालण्यास मालक (समाजव्यवस्था) अधिक जबाबदार आहे. त्याच्या व्यवस्थेतून पुन्हा चोर जन्माला येऊ नये म्हणून मी त्यालाच (व्यवस्थेला) शिक्षा सुनावत आहे. चोरापेक्षा त्याला जन्माला घालणारी व्यवस्था (परिस्थिती) अधिक जबाबदार आहे. माझा निवाडा योग्यच आहे.''**

आपण कैद्यांचा आणि त्याच्यातील गुन्हेगाराचा जेव्हा विचार करतो तेव्हा मुळाचा विचार करत नाही आणि केला तर फार गांभीर्याने तो करत नाही. दृश्य स्वरूपाचा अधिक विचार करत असतो. तुरूंगात जाऊन पाहिल्यानंतर कैद्यांचे वेगवेगळे प्रकार दिसतात. प्रत्येक कैद्याचे आयुष्य म्हणजे कथा, कविता, कादंबरीच असते. तुरुंगात राहून आणि शिक्षा भोगत असतानाही अनेक जण आपले भावविश्व जपण्याचा प्रयत्न करत असतात. आपण गुन्हेगार का झालो असा प्रश्न स्वत:च्या मनाला वारंवार विचारत असतात. प्रश्न विचारतच ते भूतकाळ खोदायला लागतात. तो खोदत, खोदत आपल्या पूर्वाश्रमीच्या जीवनापर्यंत पोहोचतात. अशा जीवनापर्यंत की जेथे त्यांच्यासमोर नसतात गजाचे पिंजरे आणि हातात बेड्या! त्यांच्यावर पाळत ठेवण्यासाठी नसतो कोणी शिपाई किंवा खेकसणारा वॉर्डन! त्यांच्या छातीवर नसतो बिल्ला किंवा अंगात नसतात कैद्याची वस्त्रे. तो वारंवार स्वत:ला खोदत राहतो. या खोदकामात मग तो माणूस म्हणून स्वत:चा, स्वत:च्या भावभावनांचा विचार करतो. व्यक्ती

आणि व्यक्तीने बनलेल्या समाजाचा आणि त्याच्यातील विकारांचाही विचार करायला लागतो. विचार करत असताना तो कधी आपल्या नशिबाला तर कधी परिस्थितीला साक्षी ठेवत असतो. कोणत्यातरी एका धुंदीत किंवा प्रसंगी जाणते-अजाणतेपणाने केलेल्या गुन्ह्याविषयीही तो प्रश्न उपस्थित करू लागतो. सर्वच प्रश्नांनी उत्तरे त्याला मिळत नाहीत. काही उत्तरे टणक कवचातून बाहेर येतच नाहीत तर काही हातात पकडण्यापूर्वीच घरंगळून जातात. काही उत्तरे समजाव्यवस्थेवर कोरडे ओढतात, तर काही कल्पित दैवाविषयी बोटे मोडतात. काही उत्तरे पूर्वजन्म, पुनर्जन्मापर्यंतच्या कल्पनांपर्यत त्याला नेऊन पोहोचवतात. कैदी भूतकाळातच अडकत नाही, तर भविष्याविषयीही स्वप्ने रंगवायला लागतो. त्याविषयीची चित्रे क्षणाक्षणाला त्याच्या मनात निर्माण होतात. तो शरीराने तुरूंगात पण मनाने मात्र तुरुंगाबाहेर असतो. त्याच्या भावनांची ही सर्व तरल स्पंदने शब्दांचे रूप घेऊन कवितांमध्ये प्रकट होतात. बराकीमधील भेसूर पण निवांत वातावरणात तो रोज लाखो प्रश्न जन्माला घालतो आणि त्या सर्वांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतो. प्रश्न आणि उत्तरांचा अथक खेळ खेळण्यासाठी तो कवितेला माध्यम म्हणून वापरण्याचा प्रयत्न करतो.

कविता ही माणसाची सच्चेपणाने सोबत करणारी गोष्ट आहे, असे म्हणतात. कवितेतून कैदी आपल्या भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. सगळ्या प्रकारच्या भावना त्याच्या कवितेत सापडतात. प्रेम, विरह, कुटुंब, समाज, देव, दानव, देश, परदेश, धर्म आदी सर्वांचे दर्शन घडवण्यासाठी तो कवितेशी मैत्री करतो. कविता म्हणजे त्याचे स्वगतच जणू! तिच्या शब्दाशब्दांत तो आयुष्याचा पट भरण्याचा प्रयत्न करतो. त्याची कविता ओबडधोबड आहे. तिच्यावर संस्कार करणारी, तिला फुलवणारी, गोंजारणारी आणि भरारी मारण्यास लावणारी व्यवस्था तुरुंगात अभावानेच असते. काही कैदी आपले लेखन नियतकालिके व अनियतकालिके यांच्याकडे पाठवण्याचा प्रयत्न करतात. त्यातून आपली कैफियत आणि भावविश्वही लोकांसमोर नेण्याचा प्रयत्न करतात. पण सर्वांनाच हे जमत नाही. अनेकांची कविता ओबडधोबड राहते. बऱ्याच वेळेला तिला सौंदर्याचे आवरण नसते. पण साधेपणालाही कमीलीचे सौंदर्य असते आणि साधेपणात कमालीचे बळही असते असे म्हणतात. हाच निकष पुढे सरकावयाचा झाल्यास कैद्यांच्या कविता साध्या जरुर आहेत पण त्यांच्यात आशयाचे बळ मात्र जबरदस्त आहे. त्यांच्या कवितेतून उपस्थित झालेल्या प्रश्नांनी उत्तरे देताना घुमसट व्हावी अशी स्थितीही काही वेळेला निर्माण होते. साधेपणा मनाला घायाळ करुन जातो. कविता वाचताना माणूस

अस्वस्थ तर होतोच शिवाय या अस्वस्थेपोटी समाजव्यवस्था उसवण्याचा विचारही त्याच्या मनाला चाटून जातो. समाजाच्या अंगाखांद्यावर वाढणाऱ्या विकारांकडेही तो नजर वळवण्याचा प्रयत्न करू लागतो. कैदी आणि समाजातील नागरिक यांच्यातील अंतर कमी करण्याचे बळही या कवितांमध्ये आहे. समाजाला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडण्याचाही प्रयत्न कविता सहजपणे करुन जातात.

तुरुंग म्हणजे गुन्हेगारांसाठीशिक्षा भोगण्याचं एक विलक्षण जग. कैदी प्रथम जेव्हा तुरुंगात जातो तेव्हा तेथील शिस्त, या शिस्तीतून निर्माण होणारे भय, चिरेबंदी भिंती, शस्त्रधारी शिपाई सारे काही त्याला नवखे असते. अशा बेसूर, रुक्ष आणि दहशतीच्या वातावरणात त्याला शिक्षेचे दिवस काढायचे असतात. यावर उजेड टाकताना फिलीप भीमराव शिरसाठ नावाचा कैदी कवी म्हणतो,

**इथं गुदमरलेली मानसिकता**
**भावनांची दाहकता**
**हरवलेली संकल्पना**
**शोधत आहे खऱ्या अस्तित्वाला.**

तुरुंगात भल्याभल्यांची घुमसट कशी होते याविषयी बरेच काही लिहून आले आहे. खरे तर घुसमट करण्यासाठीच तुरुंग असतो असा आजही समज -गैरसमज आहे. पण या घुसमटीतून मनाचे पाखरू उडण्याचा, फडफडण्याचा प्रयत्न करत असतेच. अर्थात ही फडफड, हे विहारणे कवितेपुरतेच असते कारण प्रत्यक्षात समोर असतात ते काळे गज. गजातून शरीर बाहेर काढायचे नसते पण मन बाहेर काढण्यास कोण रोखणार? मन तर भुर्रकन उडून जाते. अगदी कैद्याच्या गावात, घरात, कुटुंबातही. अनेक कैद्यांना आईच खूप जवळची वाटते. गुन्हेगारांचा शिक्का बसलेल्यां मुलांनाही आपल्या कुशीत घेण्याची ताकत फक्त मातेतच असते. औरंगाबादच्या तुरुंगातील कैदी अनिल सुभाषराव वैद्य म्हणतो, खरे तर म्हणतो असे म्हणण्यापेक्षा तुरुंगात राहून त्याने आपल्या आईशी कवितेतून केलेला हा संवाद पहा,

**आई,**
**किती सोसल्या तू**
**मजसाठी खसता**
**शून्य मी आता**
**दूर तू असता**

नसे खेद कारावासाचे
हे तर भोग नशिबाचे
दुःख आहे मजसाठी
तुझ्या व्याकूळ श्वासाचे
किंवा
उदरी जन्म घेऊनी
दुःख पेरुन मी गेलो.

कैद्यांना जशी आईची आठवण येते तशीच ती प्रेयसीचीही येते. या प्रेयसी कवितेतील की वास्तवातील माहीत नाही पण अनेकांच्या कवितेत प्रेम आणि विरह याचे दर्शन घडते. रमेश बाबूराव खाडे म्हणतो,

माझं हृदय सोडून
बांधलसं एक घरटं
थाटलास संसार आनंदानं
रमलीस तू छायेत स्वतःच्या
माझी काया न पाहता

रवींद्र केवल बच्छाव हा तर उच्चविद्याविभूषित म्हणजे एम. ए. बी. एड्. झालेला कैदी. तो वेदनीय मृगजळ या कवितेत म्हणतो,

मन माझे काबूत आले तरी
मनात विचार तुझेच आहेत
विसरण्याच्या प्रयत्नांतही
आठवण अजून तुझीच आहे
आज मी माझ्यावर रुसलो
तुझ्यावर प्रेम करुन का फसलो?

काही कैदी तुरुंगात राहूनही गावाच्या आठवणीत रमतात. मग या आठवणीच कविता होऊन कागदावर उतरतात. भ. ल. बिरादार म्हणतो,

होतं एक गाव
तिथं माझा ठाव
पण आता काय सांगू नाव
गावाचे मी?
कळून, नकळूनिया केले

**दूष्टचक्रात गुंफिले**
**उद्ध्वस्त ते सर्व झाले क्षणात सारे**

अनिल वैद्य आपल्या कवितेतील प्रेयसीला खूपखूप जाब विचारताना म्हणतो,

**तुझ्याचमुळे दिसले जीवन सुंदर**
**जळले तुझ्याच ज्वालेने प्रखर**
**होता मायेचा हा चमत्कार**
**पुन्हा आता जळायचे नाही.**

काही कैदी प्रेमाच्याही पलीकडे जाऊन व्यवस्थेचा अतिशय गंभीरपणे विचार करतात. व्यवस्थेवर कडाडून लिहिताना रियाझ बादशहा मुल्ला म्हणतो,

**जेव्हा मी या जगाचा इतिहास लिहिन**
**त्यात माझ्यावर झालेला अन्याय लिहिन**
**निर्दोषींना दोषी करार देणाऱ्या**
**व्यवस्थेचा इतिहास लिहिन.**

आपण व्यवस्थेमुळेच कैदी झालो. व्यवस्थेमधील चुकांमुळेच आपल्या कपाळावर गुन्हेगार म्हणून शिक्का बसला अशी अनेकांची भावना आहे. ती व्यक्त करण्यासाठी अन्य व्यासपीठापेक्षा त्यांना कविताच जिव्हाळ्याचे व्यासपीठ वाटत असावे. सदाशिव यादव गायकवाड हा तर आपल्यावरील अन्यायाची कैफियत थेट परमेश्वराकडे करताना म्हणतो,

**जन्म माझा व्यर्थ जीणं**
**अन्यायाने झालो दिन**
**जाऊ कुठं तुजविण**
**हे भगवंता धाव नाऽऽ**
**धावत आलो तुझ्या चरणा**

एकदा का कपाळावर कलंक चिकटला की मनाची अवस्था नेमकी कशी होते, समाज आपल्याकडे कसा पाहतो हे सांगताना प्रकाश तुकाराम कदम म्हणतो,

**अपराधाचा कलंक माझ्या माथी**
**लोखंडी बेड्या लावलेल्या हाती**
**जीवलग माझे दुरुन पाहती**

किंवा

**माणूस म्हणून माझ्यात राब नाही**
**जनमानसात माझे नाव नाही**

मनोहर रणभिसे आपल्याला झालेल्या शिक्षेविषयी स्वत:लाच प्रश्न विचारत म्हणतो,

**कसा आला जीवनी माझ्या वनवास**
**हृदय फाटले, जमीन दुभंगली**
**झाला माझा सर्वनाश**
**आता कशी लागेल**
**माझी नाव किनाऱ्यावर**
**माणसातून उठलोय मी**
**मन नाही माझं थाऱ्यावर**

दत्ता पाटील रहाणे तुरुंगातील आयुष्याचे वर्णन करताना पुढील ओळी लिहून जातो,

**गडद अशा अंधारानं**
**भयभीत झालेलं मन उर्जेच्या कृत्रिम प्रकाशाकडे**
**अधाशासारखं पहात रहातं**
**पश्चातापाच्या धुरानं**
**ते अधिकच गडद होतं**
**लागलेला वणवा कधी तरी विझेल**
**या आशेवर जगत राहतं**

तुरुंगातील जीवन वाट्याला आल्यामुळे आयुष्यात अंधार आला, दु:खाचे पर्व सुरू झाले. समाजात आपल्याला प्रतिष्ठा राहिली नाही. सगेसोयरे दूर गेले, पण हेही दिवस जातील. अंधारातही कुठे तरी कवडसा दिसेल. त्याच्या प्रकाशानं भविष्यकाळ घालवता येईल असा आशावाद अनेक कवितांमध्ये आहे. शेवटी माणूस आशेवर अधिक जगतो. अंधाराच्या गुहेत उजेड सोडणाराही माणूस असतो आणि उजेडाला नख लावून पश्चाताप करणाराही माणूस असतो. माणसाची रूपे असंख्य असतात. कैदी हे त्यापैकी एक. कैद्यांच्या अनेक कवितांमध्ये पश्चातापाची भावना आहे. अजाणतेपणाने अथवा भावनेच्या वादळांना रोखू न शकल्याने आपल्या हातून कसे विपरित घडले यावर भाष्यही आहे.

इतरांच्या वाट्याला असे येऊ नये यासाठी ते सावध राहण्याचा उपदेश करतात माणसांमधील विकार माणसांमधील सैतानाला जागे कसे करतात हेही सांगतात. दत्ता पाटील याने तर तुरुंगाला प्रायश्चित भोगणाऱ्या माणसांचं जग असं म्हटलं आहे. अस्सल गुन्हेगारांपासून तुरुंगातील जग कसे लांब आहे हे सांगताना कवी म्हणतो,

**सदोष निर्दोष, निष्पाप**
**म्हणून वागणाऱ्या कायद्याच्या**
**कचाट्यातून पळ काढून जगणाऱ्या**
**सर्वसामान्यांचा विश्वासघात करणाऱ्या**
**अस्सल गुन्हेगारांपासून लांब असलेल्या**
**माणसांचं जग.... तुरुंग.**

बाहेरच्या जगातील व्यवस्थेमुळेच आपण कैदी झालो. कायद्याच्या लढाईत हरल्यामुळे कैदी झालो अशीही भावना अनेक कवितांमध्ये पाहायला मिळते.

तुरुंगात गेल्यावर आपली अवस्था नेमकी कशी होते हे सांगताना संतोष सटवाजी ससाणे म्हणतो,

**होतो मी आझाद सुखी पोपट**
**आहे आता पिंजऱ्यात अटक**
**कसे सांगू परिस्थिती आहे बिकट.**

तुरुंगातील जीवनाविषयी परमेश्वराकडे कैफियत मांडताना रमेश बाबूराव खाडे म्हणतो,

**अमर्याद बंधनात**
**आयुष्यभर रहायचे**
**नयनातील अश्रू**
**पाण्यासम वहायचे**
**सांग ईश्वरा सांग**
**हे कुठंवर भोगायचे**
**फक्त आणि फक्त**
**गगनच पहायचे.**

शिवाजी साळुंकेची कविता अधिक पक्व वाटते. तुरुंगात अंधाराशिवाय आणखी काही मिळते हे सांगताना तो अंधार आणि उजेडासारख्या भावनांमधील

द्वंद्वही नमून करतो. तो म्हणतो,

**नियतीचे प्रहार झेलण्यासाठी**
**इथे मनाची मशागत होते**
**कुणाच्या तरी अलवार आठवणीने**
**मात्र काळीज सशागत होते**

एवढ्यावरच न थांबता तो पुढे म्हणतो,

**आम्ही असे कंगाल बाजारात पत नाही**
**हारणेच वाट्याला आले जिंकण्याची जिद्द नाही**
**चोरीला गेला न चंद्र अशी कधी रात नाही**
**चांदण्याचं काय पण चंद्राचीही धडगत नाही.**

माणसात लपलेल्या विविध भावनांचं हितेश शहानं अतिशय छान वर्णन केलं आहे. देवत्त्वाकडे जाणाराही माणूस असतो आणि सैतान होणाराही माणूसच असतो. त्याचा सारा प्रवास काही ना काही होण्यासाठीच असतो. कधी त्याला योग्य मार्ग सापडतो तर कधी अयोग्य. माणसाचा प्रवास सतत चालूच असतो हितेश शहा म्हणतो,

**माणूस आतल्या आत**
**किती प्रवास करत असतो**
**कधी लालसेनं, कधी श्रद्धेनं, कधी रागानं**
**कधी सैतान बनण्यापर्यंत तर**
**कधी देव होण्यापर्यंतचे अंतर**
**तो कापतच असतो.**

एकदा का एखादा तुरुंगात गेला आणि त्याच्यावरील गुन्हा सिद्ध झाला तर हळूहळू त्याचे नातेवाईक त्याच्यापासून दूर जायला लागतात. सारा समाजच त्याच्यापासून दूर जातो. बहिष्कृत जीणे कैद्यांच्या वाट्याला येते. कालपर्यंत सारे होते पण आज कोणीच नाही अशी त्याची अवस्था होते. तुरुंगात आपल्याला भेटण्यासाठी कोणी आलेच तर त्याला खूप अप्रूप वाटते. सग्यासोयऱ्यांची भेट म्हणजे त्याच्या अंधारमय आयुष्यात उगवलेला आशेचा किरणच असतो. अशा किरणांची तो सातत्याने प्रतीक्षा करत असतो. ही किरणे कधी माणसाच्या रूपात, कधी पत्रांच्या रूपात, कधी अन्य संदेशाच्या रूपात यावीत अशी त्यांची अपेक्षा असते. कैदी पत्राद्वारे भरभरून बोलतो. भेटण्यास

आलेल्यांशी तर किती बोलू आणि किती नको असे त्याला होते. भेट कधीच संपू नये असे त्याला वाटते. नातेवाईकांकडून येणारे पत्रही लांबलचक असावे, शिक्षा संपेपर्यंत पत्र संपू नये असे अनेक कैद्यांना वाटत असते. तुरुंगात वाट्याला आलेला एकलेपणा घालवण्यासाठी त्याला अशा वेगवेगळ्या स्वरुपातील संवादाची खूप गरज भासत असते. घरट्यातील पिलू जसे पक्ष्यांची वाट बघत असते तसा कैदी टपालाची वाट बघत असतो. टपालासाठी त्याच्या जिवाची होणारी घालमेल शिवाजी साळुंकेने अतिशय हृदयद्रावक शब्दांत टिपली आहे. तो म्हणतो,

**इथलं पत्र**
**जमिनीचं काय झालं विचारतं**
**जमिनीत काय पेरलं हे सुद्धा विचारतं**
**इथलं पत्र**
**बेघर झाल्याच्या वेदनेनं पत्र**
**घर आठवत राहतं**
**शब्दांचं ओझं वाहतं**
**पत्र खूप काही सांगत राहतं**

तुरुंगात राजकीय कैदी म्हणून गेलेल्यांनी अतिशय उच्च दर्जाचं साहित्य लिहिलं आहे. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडित जवाहरलाल नेहरू, जयप्रकाश नारायण, आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी अशी किती तरी थोर नेत्यांची नावे याबाबत घेता येतील. तुरुंगात असताना त्यांनी लिहिलेलं साहित्य अजरामर झालेले आहे. वेगवेगळ्या प्रकारचे फौजदारी अथवा दिवाणी गुन्हे करून तुरुंगात गुन्हेगार म्हणून गेलेल्या आणि आत्मपरीक्षण करणाऱ्या मंडळींचं साहित्य मात्र अद्याप बाहेरच्या जगाला विपुल प्रमाणात उपलब्ध होत नाही. अलिकडे तुरुंगात कवी संमेलने, साहित्य संमेलने भरु लागली आहेत. विपश्यनेचे वर्ग चालवले जाऊ लागले आहेत. शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाऊ लागली आहे. कोणत्या तरी कारणाने गुन्हेगार बनलेल्यांमधील माणूस जागा करण्याचा आणि जपण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या मार्गाने होतो आहे. कैद्यांनी स्वत:च स्वत:ला प्रश्न विचारून शोधलेल्या उत्तराचे प्रतिबिंब म्हणूनही त्यांच्या कवितांकडे पाहावे लागेल. कारण मुळातच कवितेचे आणि काळजाचे नाते असते. कैद्यांच्या भावविश्वाचा शोध घेण्यासाठी, कोठडीतही त्याच्या काळजात उठणारे तरंग पाहण्यासाठी, पश्चातापाच्या ज्वरात होरपळून निघणारे त्याचे मन पाहण्यासाठी, भविष्याविषयी त्याने उभे केलेले स्वप्नांचे इमले

पाहण्यासाठी कविता निश्चितच उपयोगी पडतील असा मला विश्वास वाटतो. या संग्रहात दिसणाऱ्या काही कविंनी आयुष्यात प्रथमच आणि तीही तुरुंगातच कविता लिहिली आहे. काहींना जन्मठेपेची तर काहींना विशिष्ट काळासाठी शिक्षा झालेली आहे. शिक्षा भोगून आल्यानंतर तर समाजाने आपल्याला समजून घ्यावे अशी आर्तही कवितेत दिसते. एकाच वेळी स्वत:शी, समाजाशी आणि त्याने तयार केलेल्या व्यवस्थेशी केलेला संवाद म्हणजे या कविता आहेत असे मला वाटते.

कैद्यांना सणावाराच्या दिवशी नातेवाईकांची आठवण अतिशय तीव्रतेने येते. त्यातही रक्षाबंधन, दिवाळी यांसारख्या सणाला तर ती अतिशय प्रखरतेने होते. काही वेळा नातेवाईक येतच नाहीत तरीही मनातील भावना काही हद्दपार होत नाहीत. त्या शब्दबद्ध करून कैदी कविता जन्माला घालतो. कवितेतच तो सण साजरा करतो. परशुराम मेरंदेसारखा कैदी 'रक्षाबंधन' कवितेत म्हणतो,

**आला, आला रक्षाबंधनाचा दिवस**
**आज बहीण नाही माझ्या नजरेस**
**आज आहे मी बंद या तुरुंगात**
**परी येती फार आठवणी मनात**

माणूस कुठेही आसला तरी त्याच्या संवेदना जाग्याच असतात. तुरुंगही त्यास अपवाद असत नाही. तुरुंगाने शरीरावर नियंत्रण ठेवले आहे. बाहेर सुटण्याचे शरीराचे मार्ग बंद केले आहेत. बेड्या घातल्या आहेत त्या हाताला. मन मात्र या सर्वांपासून मुक्त आहे. कदाचित ते राखी बांधून घेऊन आले असणार. तुरुंगातील या कवींना जशी नाती आठवतात तसे बालपण आठवते, गावाकडची माती आठवते, याच मातीतून जन्माला आलेली संस्कृती आठवते. निसटून गेलेले क्षण आठवतात. या सर्वांची तो गोळाबेरीजही करतो. बालपणाविषयी मेरंदे म्हणतो,

**तानुला मी वाढत होतो**
**मातेच्या कुशीमधी**
**चघळीत होतो करंगुली निज मुखामधी**

बालपणाचे वर्णन करता करताच कवी आयुष्यात अपघाताच्या वळणावर पोहोचतो आणि गुन्हेगार बनतो. बालकापासून गुन्हेगारापर्यंतचा हा सर्व प्रवास तो कवितेत पकडण्याचा प्रयत्न करतो. तो पुढे म्हणतो,

**नाही सुखी करू शकलो मी संसार**
**वागलो बेफाम, पुढचा नाही केला विचार**
**अज्ञानाच्या त्या भरात, आलो मी जेलात**
**भ्रम आता दूर झाला, प्रकाश पडला मस्तकात.**

तुरुंगात गेलेला आणि शिक्षा झालेला माणूस जेवढा स्वत:विषयी संवाद करतो तेवढा अन्य कोणी बहुधा करत नसावा. एका अर्थाने संवादाद्वारे तो स्वत:च स्वत:ची साक्ष काढतो. कवितेवरही भरभरून प्रेम करतो. दारे, खिडक्या बंद असलेल्या इमारतीत तो मनाचे दरवाजे सदैव उघडे ठेवतो कारण त्यातूनच जन्माला येते कविता आणि तीच बनते त्याची सच्ची सोबती.

नाशिकचे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांनी मध्यवर्ती कारागृहाला अनेक वेळा भेट दिली. त्यांच्यासोबत मीही काही वेळा गेलो. कुसुमाग्रज तुरुंगात भेट देण्यासाठी गेले, की तेथे कविसंमेलन व्हायचे. तुरुंगातील कैदी आपल्या रचना सादर करायचे. कुसुमाग्रज यांचा म्हणजे तात्यासाहेबांचा हात आपल्या पाठीवरून फिरावा अशी अपेक्षा बाळगायचे. तात्यासाहेबांनी त्यांच्या कविता ऐकल्या की त्याना हुरूप यायचा. कैदी पुन्हा कविता लिहायचे. नाशिकच्या तुरुंगातील कविता एकत्र करून एखादा काव्यसंग्रह काढण्याची कल्पना त्यातून पुढे आली. या काव्यसंग्रहाची जबाबदारी मी स्वीकारली. प्रारंभी दोन-चार कविता मिळवून ***गजाआडच्या कविता*** या शीर्षकाखाली **सकाळ**मध्ये एक लेखही लिहिला. लेखात समाधान झाले नाही. कैद्यांच्या अजून कविता जमा कराव्यात, या कवितांच्या खोलात जावेसे वाटत होते. तात्यासाहेबांची स्फूर्ती आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सहकार्य यामुळे हे करता आले. इंदूरच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी हा प्रातिनिधिक कवितासंग्रह मंडळ प्रकाशित करेल असे जाहीरपणे सांगितले. त्याचबरोबर काव्यसंग्रहाच्या संपादनाचे काम मीच करावे असा प्रेमाचा आदेशही दिला. एकूणच या कार्याला गती आली. महाराष्ट्रभरातील तुरुंगातील कैद्यांना पत्रे पाठविली. अनेकांनी उत्स्फूर्तपणे कविता पाठवल्या. काहींनी कथा, कादंबरी, एकांकिकाही पाठवल्या. अमराठी कैद्यांच्या हिंदी रचनाही आल्या. तुरुंगातही साहित्य किती समृद्ध आहे याची प्रचीती पुन्हा एकदा आली. काव्यसंग्रह आकाराला आला.

नाशिकच्या तुरुंगात जाऊन कैद्यांच्या विकासासाठी वेगवेगळे उपक्रम

राबवणाऱ्या सरोज दायमा, मुक्तेश्वर मुनशेट्टीवार तसेच कैदी शिवाजी साळुंखे, हितेश शहा आदींचे कविता मिळविण्याबाबत चांगले सहकार्य लाभले. नाशिकच्याच सामाजिक अभीसरण या संख्येने गेल्या काही वर्षापासून कैदी बांधवाच्या विकासासाठी वेगवेगळे उपक्रम आखले. या काव्यसंग्रहासाठीही त्यांच्या सक्रिय शुभेच्छा महत्त्वाच्या आहेत. राजकुमार गुप्ता याने तर गेल्या काही वर्षापासून तुरुंगात राहूनही माझी ओळख ठेवली आहे. तुरुंग खात्याचे उपमहानिरीक्षक धनाजीराव चौधरी, दे. ना. दवणे, मित्र आर. जे. डोळस आदींचे सहकार्य कामी आले. सर्वच कैद्यांच्या कविता माझ्यापर्यंत पोहोचल्याही नसतील. प्रयत्नांती उपलब्ध झालेल्या कविता या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत. अधूनमधून असे संग्रह प्रसिद्ध झाल्यास तुरुंगातील कविता नेमकी कोठे आहे याचा बाहेरच्या समाजाला वेध घेता येईल. कवितेबरोबरच अन्य साहित्यही प्रकाशात येण्याची आवश्यकता आहे. गुन्हा करून एखादा माणूस कैदी बनत असला तरी तो मुळात माणूस आहे. कैदी म्हणजे त्याच्या आयुष्याचा एक अतिशय छोटा भाग आहे. कैद्यातला माणूस समजून घेण्यासाठी साहित्य हे एक प्रभावी माध्यम आहे. या माध्यमाकडे समाजाने ओल्या काळजाने आणि करुणेच्या डोळ्यांनी पाहण्याची गरज आहे. दुभंगलेल्या मनाच्या या कविता वाचकांनी जरूर वाचाव्यात आणि अपघाताने अथवा अन्य कारणाने कैदी बनलेल्यांना पुन्हा चांगला माणूस होण्याचे बळ द्यावे हीच विनंती. ***महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने*** वेगळ्या वाटेवरून जाऊन गजाआडचे भावविश्व कवितांच्या माध्यमातून समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केला याबद्दल धन्यवाद! तात्यासाहेबांचे एक स्वप्न त्यांच्या नंतर का होईना पण प्रत्यक्षात आणण्याची मला मिळालेली संधी खरे त्यांना वाहिलेली आदरांजली ठरावी असे मला वाटते. ही वेगळी आदरांजली वाहताना मी स्वत:ही धन्य झालो आहे. कविता जमवण्याच्या कामी विजयकुमार इंगळे यांची झालेली मदतही येथे नमूद करतो.

**– उत्तम कांबळे**

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवासी | हितेश शहा | १ |
| २. | आंधळा | हितेश शहा | २ |
| ३. | सांग ईश्वरा सांग | रमेश बाबूराव खाडे | ३ |
| ४. | सांगता | रमेश बाबूराव खाडे | ४ |
| ५. | क्षणभर | भ. ल. बिरादार | ५ |
| ६. | माझं गाव | भ. ल. बिरादार | ६ |
| ७. | इतिहास | रियाझ बादशहा मुल्ला | ८ |
| ८. | देवा तू कुठे असतो? | रियाझ बादशहा मुल्ला | ९ |
| ९. | का आलीस? | अनिल सुभाषराव वैद्य | १० |
| १०. | लाचार पोपट | संतोष सटवाजी ससाणे | १२ |
| ११. | आईची सावली | संतोष सटवाजी ससाणे | १३ |
| १२. | आई | अनिल सुभाषराव वैद्य | १४ |
| १३. | वनवास | मनोहर रणपिसे | १५ |
| १४. | कलंक | प्रकाश तुकाराम कदम | १६ |
| १५. | जन्मठेप | रवींद्र संतोष बनसोडे | १७ |
| १६. | आई | दत्ता पाटील-रहाणे | १८ |
| १७. | तुरुंग | दत्ता पाटील-रहाणे | २० |
| १८. | इथं | फिलीप भीमराव शिरसाठ | २२ |


| | | | |
|---|---|---|---|
| १९. | तुरुंगाच्या भिंती | फिलीप भीमराव शिरसाठ | २३ |
| २०. | आई | सदाशिव यादव गायकवाड | २४ |
| २१. | धावा | सदाशिव यादव गायकवाड | २५ |
| २२. | भारत माता की जय | परमेश्वर नाना साबळे | २६ |
| २३. | भारताला एकतेने नटवा | रामजी धर्माजी दुधमल | २७ |
| २४. | गोडी लुटा गुणाची | रामजी धर्माजी दुधमल | २८ |
| २५. | वेदनीय मृगजळ | रवींद्र केवळ बच्छाव | २९ |
| २६. | फांदी आणि फूल | रवींद्र केवळ बच्छाव | ३० |
| २७. | आठवण तुझी | फुलचंद्र चंद्रभान ढाकणे | ३१ |
| २८. | तळमळतो मी | फुलचंद चंद्रभान ढाकणे | ३२ |
| २९. | आठवण | नरेश चरणसिंग राठोड | ३३ |
| ३०. | सबब | नरेश चरणसिंग राठोड | ३४ |
| ३१. | सहज | शिवाजी दत्तू पाटील | ३५ |
| ३२. | एका चुकीमुळे | प्रकाश तुळशीराम पंडित | ३६ |
| ३३. | जीवनाचा अर्थ | प्रकाश तुळशीराम पंडित | ३७ |
| ३४. | पत्र कारागृहातलं! | शिवाजी वेडू साळुंके | ३८ |
| ३५. | सायरन... कारागृहातला... | शिवाजी साळुंके | ४१ |
| ३६. | इथे आम्ही | शिवाजी साळुंके | ४३ |
| ३७. | उपमा | दिनेश मोहन पवार | ४४ |
| ३८. | प्रीत | दिनेश मोहन पवार | ४५ |
| ३९. | रक्षाबंधन | परशुराम उमा मेरंदे | ४६ |
| ४०. | जीवन कहाणी | परशुराम उमा मेरंदे | ४७ |

# प्रवासी

ऋतु बदलताच स्वरक्षणासाठी
स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांना
प्रवासी म्हणतात ना!
माणूस तर आतल्या आत
किती प्रवास करतो?
कधी लालसेने
कधी श्रद्धेने
कधी रागाने
कधी सैतान बनण्यासाठी
तर कधी देव होण्यासाठी
सारखे अंतर कापतच असतो




– **हितेश शहा**
नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह



# आंधळा

काळ्या कभिन्न दगडांच्या
भिंतीत कोंबलेला माणूस...
त्याच्याकडे असते
मर्यादीत दृष्टी आणि
मर्यादीत विचारधारा
आंधळ्या डोळ्यांची उघडझाप व्हावी
तसा उघडणारा दरवाजा
ज्यातून प्रवेशतात
तेच ते भांबावून टाकणारे विचार
अंध व्यक्तींचेही
तसंच नसतं का?
जगात राहून सुद्धा
एकाकी, एकटा
मर्यादीत दृष्टी, ज्ञान
आणि विचारधारा असलेला आंधळा.



– हितेश शहा
नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह

# सांग ईश्वरा सांग

अमर्याद बंधनात
आयुष्यभर रहायचे
नयनातील अश्रू
पाण्यासम वहायचे
झिर-झिर झिरपून
जीवन कंठायचे
नातीगोती सर्व काही
इथेच विसरुन जायचे
फक्त आणि फक्त
गगनच पहायचे.
सारखेच दुःखाचे डोंगर
सांग कसे, सर करायचे?
जीवनातील खाचखळगे
काय दगडांनीच भरायचे?
फक्त आणि फक्त
गगनच पहायचे.
अपराधी निरपराधी
कसे तुला सुचवायचे?
ऐकून न ऐकल्या सारखेच
किती हाती सांगायचे
रात्रीची गस्त
सकाळही त्रस्त
सांग ईश्वरा सांग
हे कुठंवर भोगायचे?
फक्त आणि फक्त
गगनच पहायचे!

**– रमेश बाबूराव खाडे**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# सांगता



माझं हृदय सोडून
बांधलंस एक घरटं
थाटलास संसार
आनंदानं....

रमलीस तू
छायेत स्वत:च्या
माझी काया
न पहाता....

मोडलंस मन
पाहून तू
जोडलंस नातं
न पहाता....

एका क्षणात परकं केलंस
प्रेमाच्या वाटेवरुन
चालता चालता...

एवढी दुरावलीस की, कळलंच नाही
कधी झाली, तुझ्या माझ्या
प्रेमाची सांगता
प्रेमाची सांगता....

— रमेश बाबूराव खाडे
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह


# क्षणभर

डोळे मिटून स्वप्न पाहता
दिसती सर्व नाती आता
सुख-शांती
सौख्य नांदते
वायुसंगे मन रमते
क्षणभर डोळे मिटुनी स्वप्न पहाता

डोळे उघडीता सर्व दिसते
कैदी बांधव, पाहरे आतले
मन हे दचकुनी दंग होते
असे होण्यास नको होते

आशेचा किरण दिसेल का?
स्वप्ने साकार होतील का?
आजाण मन अजुनी पाहते
पाहता आता, नांदते, रमते
क्षणभर डोळे मिटुनी स्वप्न पाहता

— भ. ल. बिरादार
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह



# माझं गाव

होतं एक गाव
तिथं होता माझा ठाव
पण आता काय सांगू नाव
गांवाचे मी?

गांवात होत घर
काढले गांवाबाहेर
आठवूनी सांगावे काय बरं
त्याचे मी?

कळून - नकळूनिया केले
दुष्टचक्रात गुंफीले
उध्वस्त ते हे सर्व झाले
क्षणात सारे!

शेजाऱ्यावर होती प्रीती
गेली विसरुनी नीती
नष्ट पावली नाती
माझी हो!

आदराची होती मनं
विसरुन गेली सर्वजणं
देहात साठवून जाणं
पाहातो मी!

निर्लोभी होता जीव
गावात होतं नांव
आप्तेष्टाला न पहावं
माझे हे!

होतं एक गाव
तिथं होता माझा ठाव
पण आता काय सांगू नाव
गावाचे मी?

– भ. ल. बिरादार
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह


# इतिहास

जेव्हा मी या जगाचा इतिहास लिहिन,
त्यात माझ्यावर झालेला अन्याय लिहिन!
निर्दोषींना दोषी करार देणाऱ्या
व्यवस्थेचा इतिहास लिहिन!

समाजाने केलेल्या अत्याचाराची
गाथा लिहिन!
गीता, कुराणाचा खरा अर्थ लिहिन
प्रत्येक गुन्ह्यामागचा उद्देश लिहिन!

सीतेवरचा अन्याय लिहिन
सकीनेवरचा जुलूम लिहिन
मंदिराची प्रार्थना लिहिन
कुराणातील आयात सांगेन!

जेव्हा मी या जगाचा इतिहास लिहिन
त्यात माझ्यावर झालेला अन्यायही लिहिन!



**– रियाझ बादशाह मुल्ला**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# देवा तू कुठे असतो?

देवा तू कुठे असतो?
देवा तू कसा दिसतो?
तुला शोधायला मी मंदिरात गेलो
तुला शोधायला मी मशिदीत गेलो
मंदिरात पाषाणाची मूर्ती होती
मशिदीत उत्तुंग पांढरी भिंत होती
देवा तू कुठे असतो?
कुठे तुझा निवास असतो?

वाटलं तू संतांत असशील
वाटलं तू फकिरांत असशील
पण त्यांचा तर सारा देखावा असतो
देवा! कुठे तुझा निवास असतो?

तुला शोधत साता समुद्रापार गेलो
तुला शोधण्या गावाचा पार झालो
त्यांतून एका जागी बैसलो
तुझ्या शेधयात्रेत तहानलो

तेव्हा एका माऊलीने
ओंजळीत पाणी ओतले
तेव्हा - हो - तेव्हाच मला उमजले
देव देवळात नसतो, अल्ला मशिदीत नसतो
तू... माऊलीच्या हृदयात असतो....
माणसाच्या माणुसकीत असतो....

**– रियाझ बादशहा मुल्ला**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# का आलीस?

अनोळखी हा खेळ होता
डाव कधी खेळायचा नव्हता
खेळ असा का मांडला होता
तेव्हापासून मी अंतरी सुना

सुखी होतो माझ्या जीवना
का आलीस तू माझ्या मना

नव्हती कशाची आशा
का रुजवलीस मनीषा
पाऊलवाटेने जात होतो
का ओढलेस अजान वना
सुखी होतो....

पेटवायचाच होता ग्रीष्मातला वणवा
अगं! हसत जळालो असतो मी
का दाखवलास बहर वसंतातला हिरवा
कळला नाही धूर्त हा तुझा बाणा
सुखी होतो....

सुखाची ही परिभाषा आगळी
दिसे सुमनांच्या नाही पायंदळी
का वागलीस तू जगावेगळी
का दाखवल्यास तू प्रेमाच्या खुणा
सुखी होतो....

माहीत नव्हता हा मनाचा बहर
तरीही घालत होतो खूप आवर
का इतका केला कहर




का होता नयनांचा कटाक्ष काना

सुखी होतो माझ्या जीवना
का आलीस तू माझ्या मना

**– अनिल सुभाषराव वैद्य**
न्यायाधीन बंदी, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# लाचार पोपट



होतो मी आझाद सुखी पोपट
आहे आता पिंजऱ्यात अटक
कसे सांगू परिस्थिती आहे बिकट

आनंदाने खाऊनी जगत होतो
या झाडावरून त्या झाडावर उडत होतो
पावसाळ्यात चेष्टा करूनी हसत होतो
निळ्या निळ्या आकाशात,
रिमझिम पावसात नाचत होतो

होतो मी आझाद सुखी पोपट
आहे आता पिंजऱ्यात अटक
कसे सांगू परिस्थिती आहे बिकट

मला आझादी द्यायला कोणी आहे का हो तयार?
मला उडायचे आहे, मला नाचायचे आहे
निळ्या निळ्या आकाशाचा, रिमझिम पावसाचा
आनंद घ्यावयाचा आहे, कोणी आहे का हो तयार
मी आहे खूप लाचार पोपट, खूप लाचार पोपट

**— संतोष सटवाजी ससाणे**
नशिक रोड मध्यवर्ती कारागृह

# आईची सावली

किती सुखमय होते ते जावन
किती उदास आहे आताचे जीवन

होतो माऊलीच्या सावलीत
आहे आता न्यायाधिशांच्या

सकाळी उठल्या उठल्या करायची पाणी गरम
अंघोळ झाल्या झाल्या खायला घालयची गरम
खाल्ले नाही तर रागवायची, पण नरम


कधी जेवायला आलो नाही तर शोधायची वणवण
सोबत बसूनी जेवण करायची, ती पण

कधी रागावली नाही, कधी रडवलीही नाही
अशा माऊलीचे ऐकले नाही, समजलेही नाही

जर ऐकले असते, समजलेही असते
तर आलो नसतो न्यायाधिशांच्या छावणीत

अन झाले नसते असे मन हे उदास
अशी असते माऊलीची सावली

– **संतोष सटवाजी ससाणे**
नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह



# आई

किती सोसल्या तू
मजसाठी खसता
शून्य मी आता
दूर तू असता

कसा वेडा तुझा
बाळ असा भरकटला
प्रत्येक क्षण माझा
हाकेस तुझ्या आसुसला

नसे खेद कारावासाचे
हे तर भोग नशिबाचे
दुःख आहे, मजसाठी
तुझ्या व्याकूळ श्वासाचे

स्वप्नांचे साकाररूप तुझ्या
विस्कटूनी मी गेलो
उदरी जन्म घेवूनी तुझ्या
दुःख पेरूनी मी गेलो

तुजसाठीच आहे ह्रदयात धडपड
मीच केली तुझी परवड
निघुनी कसे जावे
दोहांच्या मनी हीच खडखड

जीवना माझ्या आता
अर्थ कवडीचा न उरला
शून्य मी आता
दूर तू असता



– **अनिल सुभाषराव वैद्य**
न्यायाधीन बंदी, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# वनवास

कसा आला माझ्या जीवनी वनवास
हृदय फाटले जमीन दुभंगली
झाला माझा सर्वनाश


आडवा डोंगर दुःखाचा समोर
बंदिस्त जीवन दिसे
संसाररूपी फुलं कोमेजले आता दाट धुके दिसे
रात्रंदिवस लोखंडी शिंगाच्या आत
अश्रू ढाळत बसे

आता कधी लागेल माझी नाव किनाऱ्यावर
माणसातून उठलो मी
मन नाही थाऱ्यावर
आयुष्यात अनंत वेदना झेलल्यावर

माझ्या जीवनी तृप्त ग्रीष्म का आला असेल?
आता हा समाज माझ्याकडे तुच्छतेने पाहील
जणू काय तो मला जीवनातून उठवेल

क्षणाची चूक झाली म्हणून वनवास आला
सात सागर पार करून माझ्या जीवनात शिरला

– **मनोहर रणपिसे**
औरंगाबाद मध्यवर्ती कारगृह



# कलंक

अपराधाचा कलंक माझ्या माथी
लोखंडी बेड्या लावलेल्या हाती
जीवलग माझे दुरूनच पाहती
दुबळा मी झालो. गेली नातीगोती
जीवलग मजला विसरून गेले
हुंदक्यांच्या सुरात, डोळे न्हाऊन गेले
वेदनांत जगणे कठीण आता
जन्मठेप भोगण्याशिवाय ना पर्याय आता
आठवणीच्या ढगांनी कहर केला
विजेसहीत गडगडाटही आला
एका चुकीने कसा घात केला
जन्मठेपने लगेचच हात धरला
खुले बोलण्याचा आता सराव नाही
चार भिंतींपल्याड माझी धाव नाही
माणूस म्हणून माझ्यात राब नाही
जनमानसात माझे नाव नाही


– प्रकाश तुकाराम कदम
औरंगाबाद, मध्यवर्ती कारागृह



# जन्मठेप

जन्मठेप शिक्षा भोगत
तिरडीवर जिवंत जाणं
अशा तिरडीवर बांधणारे बहू
पण सोडवणारे क्वचितच आहेत रे
कुणी शब्दांच्या प्रेमाची बेडी घालतो
कोणी शत्रू बळाचा उपयोग करतो
लोखंडी गजाआड नेऊन ठेवती
क्षणात घात करून ठेवती
गुन्हा स्वतःच करून आव आणतात
समाजनेत्याचे सोंगही घेतात
धन, दौलत, न्याय तंत्राच्या हातात
बेड्या मात्र निरपराधांच्या हातात
खोटे साक्षीदार खरे ठरतात
नोटांचे बंडल काळ्या कोटांच्या खिशात
निरपराधी येती कारागृहात
अपराधी राहती समाजात

– रवींद्र संतोष बनसोडे
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह



# आई


आई सोडून एकट्याला
तू निघून दूर गेली
वनवासी जीव हा
दैना भयाण झाली
कोणी न माझे येथे
मी एकटाच फिरतो
हृदयात आठवणीला
घेऊन तुझ्या झुरतो

नयनातील अश्रू हे
झरती गालावरी
प्रेमासाठी तुझ्या
जीव होई केविलवाणी

अगं! किती विशाल जग हे
पण कुणी कुणाचे नाही
क्षणोक्षणी मज फक्त
तुझीच याद येई

पंख छाटलेल्या पाखरांपरी
धडपडत मी जगतो
मायेचा हात शिरी कुणाचा
चुकून कधी न फिरतो


पक्षीण पिल्लास तिच्या
चोचीने दाणा चारी
धेनु वत्सासाठी फिरे
पुन्हा पुन्हा माघारी



तुझ्याविना जगी या
जगण्यात अर्थ नाही
घे बोलावून मज
ती साद आता येई

ममतेपुढे तुझ्या देवही शून्य आहे
जगात फक्त आई
तूच धन्य आहे

**– दत्ता पाटील-रहाणे**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह हर्सूल



# तुरुंग

सृजनशील समाजाच्या
व्याख्येत न बसणारं
परंतु न्यायासाठी हळहळणारं
सत्याची आशा बाळगून
त्यावर विश्वास ठेऊन
अन्यायाविरूध्द प्रतिकार
करताना, गुन्हा घडलेल्या
माणसांचं जग........ तुरुंग

सदोष, निर्दोष, निष्पाप
म्हणून वागणाऱ्या कायद्याच्या
कचाट्यातून पळ काढून जगणाऱ्या
सर्वसामान्यांचा विश्वासघात करणाऱ्या
अस्सल गुन्हेगारांपासून
लांब असलेल्या
माणसांचं जग........ तुरुंग


पदोपदी धोकेबाजीनं स्वार्थी व
बरबटलेल्या लालसी वृत्तीनं पछाडलेल्या,
नाती, गोती, धर्म, पंथ
कशाचीही तमा न करता
पापी माणसांपासून अलिप्त राहून
आपल्या गुन्ह्याचं प्रायश्चित
भोगणाऱ्या माणसाचं जग........ तुरुंग

आई-वडील, पत्नी, बहीण-भाऊ
काका-काकी, मामा-मामी
सासू-सासरे, साला-साली

मनामनांत घट्ट बसलेल्या
या नात्याचा, गुंतागुंतीचा
गुंता सोडवणारं, मायेच्या
फसव्या जगाचा परिचय
करून देणाऱ्या माणसांचं जग........ तुरुंग

उत्तुंग भिंतीच्या कणखर
दगडासारखी कठोरता शिकवणारं
लोखंडी गजासारखं टणक बनवणारं
भयावह मनाला धैर्य देणारं
संघर्ष व झुंज देऊन लढण्यास शिकवणारं
इतरांचं दु:ख बघून
स्वत:ला तत्त्वज्ञान सांगणारं,
खोटारड्या जगाची खरी ओळख
करून देणाऱ्या माणसांचं जग....... तुरुंग

**– दत्ता पाटील-रहाणे**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, हर्सूल



# इथं


इथं,
विदीर्ण काळीज
शून्य नजरा
हळवी मनं
भुकेले आहेत आर्त स्वराच्या हाकेला

इथं,
कोमेजलेले चेहरे
शुष्क शरीरं
मंद स्पंदनं
आसुसली आहेत मायेच्या स्पर्शाला.

इथं,
गुदमरलेली मानसिकता
भावनांची दाहकता
हरवलेली संकल्पना
शोधत आहे खऱ्या अस्तित्वाला

इथं,
चाकोरीबध्द जीवन
बोथटलेलं हसणं
कोरडं रडणं
याचना करत आहे स्वातंत्र्याला.

– **फिलीप भीमराव शिरसाठ**
खुले जिल्हा कारागृह, पैठण



# तुरुंगाच्या भिंती

तुरुंगाच्या उत्तुंग भिंती
आमच्यासाठी अंगाई गाती
नीती नियमांचे स्तनपान त्या
रोज आम्हा करीती

संस्काराचा गोड घासही
मायेने भरविती

नम्रतेचा देऊनी बोध
क्षीण केला आमुचा क्रोध

समतेचा देऊनी मंत्र
शिकविले आम्हा माणुसकीचे तंत्र

नाही ही नुसतीच दगडी भिंत
रोगी मनाचे करिती शुध्द चित्त

– **फिलीप भीमराव शिरसाठ**
खुले जिल्हा कारागृह, पैठण

# आई

आई तुजविणा जग दिसते हे वेगळे
नऊ महिने मी गर्भी असता
जन्म तू दिधला मज या जगता
पहावयास या रे जगता

किती तरी त्रास सहन केला
मायेचा तू वर्षाव केला
का सोडून गेलीस मजला?
जगीक जीवनामध्ये मी असता
आठवणी तुझ्या हृदयी राहता
तुझ्या आठवणीने हृदय दाटे
म्हणे सदाशिव त्या ईश्वराला
असा काय मी गुन्हा केला
राहिलो रे निराधारी

**– सदाशिव यादव गायकवाड**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# धावा

हे भगवंता धाव ना, धावत आलो तव चरणा
जन्म माझा व्यर्थ जीणं
अन्यायाने झालो दीन
जाऊ कुठं तुजविण.......
झाली आयुष्याची धुणी
संकटी पडलो मी वनी
दाऊनी मार्ग तूच गुणी........
जग मज कैसे निंदू
तूच माझा कृपासिंधू
दीनवाण होई सदू

– **सदाशिव यादव गायकवाड**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# भारत माता की जय

नमन माझे भारतमातेला, तिरंगी झेंड्याला
भारताच्या सेना जवानाला जी जी...

शाहिराचा डफ खणाणला मुक्कामी कारागृहातला
चढून शाहिरी साजाला, शाहीर गातो कारगिल गाथेला
जी जी जी ऽऽ

१९९९ सालात घुसखोरी झाली भारतात
ही गोष्ट कळता अटलबिहारीस
अटलजीने काय केले प्रश्नात
समक्ष अटलजी सीमेवर येऊन त्यांनी पाहणी केली
निरखून पाहिले सीमेला नाही सोडणार मातृभूमीला
हुकूम केला मिलटरी जवानांस
हाकला हाकला घुसखोरा जी जी जी...

भारताची फौज जबर, पळवून लावला बघा घुसखोर
भारताच्या जबर हल्ल्यांनी, धुव्वा उडविला पाकिस्तानाचा

आणि मिलिटरी तोफखाने लावले गेले आहेत
धडधड उडविले शत्रुला, भारताच्या जब्बर हल्ल्याला
घुसखोर पडू लागला
आणि लढाई अशा प्रकारे थांबलेली आहे
रक्ताच्या थारोळ्यात पडलेले जवान ज्यांची कितीही
महान ख्याती केली तरी कमीच

– **परमेश्वर नाना साबळे**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# भारताला एकतेने नटवा

(चाल स्वतंत्र)

भेदभाव मिटवा लोकशाही टिकवा
स्वतंत्र भारताला एकतेने नटवा

सर्वधर्मसमभाव आचरण ठेवा
स्वातंत्र्यासाठी हिंदू, शीख, ईसाई नको हा दुरावा
एक होऊनी सारे बंधूभाव ठेवा
स्वातंत्र्यासाठी भेदभाव मिटवा

आदर्श ठेवा फुले-आंबेडकरांचा
साऱ्यांना हाक दिली, दिला मंत्र शिक्षणाचा
धडा त्यांचा गिरवा रं राष्ट्रहिताचा
बीज समतेचे पेरा सर्वांना आज पटवा

देशद्रोही सारे दूर ठोकराया
अखंड भारत विश्वात आहे
संविधान, आमचा ध्वज तिरंगा आहे
अखंड भारत विजेत्यांत आहे
देशहितासाठी जीवाला जीव लावा

– **रामजी धर्माजी दुधमल**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# गोडी लुटा गुणाची

(चाल : तुझे भूलना तो चाहा)

गोडी लुटा गुणाची, वानात काय आहे?
चव चाखावी फळाची पानात काय आहे?
जीवनात माणसाने दुसऱ्यास
कधी हसू नये
जसे पाहावे दुसऱ्याचे आपले कुणा दिसू नये
मन मारते भरारी मारू नये त्याला
चवळी घरीच कवळी मग रानात काय आहे?
क्षुद्र शरीर पाहूनी त्या मुलीचे
खरंच रामदास या कवनात काय आहे


– **रामजी धर्माजी दुधमल**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# वेदनीय मृगजळ

या थोड्याशा प्रेमासाठी तुझ्या
जीव माझा तरसला-
माझ्या या अशा वेदना पाहून
अश्रूंसह मेघ बरसला-
पण या मृगजळापरी
जास्त जवळ गेल्याने तुझ्या
माझे सुंदर स्वप्न तुटले
दुरून दिसलेले असे गुण तुझे
जवळून खरेच अवगुण वाटले
मन माझे काबूत आले तरी
मनात विचार तुझेच आहेत
विसरण्याच्या प्रयत्नातही
आठवण अजून तुझीच आहे
आज मी माझ्यावरच रुसलो
तुझ्यावर प्रेम करून असा का फसलो?




**— रवींद्र केवळ बच्छाव**
एम. ए. बी. एड.




# फांदी आणि फूल

नाते म्हणजे नातेच असते
रक्ताचे म्हणजे रक्ताचेच असते
हे सतत ऐकत असतो आपण
म्हणूनच तर किती आशा लावून घेतो
परंतु किती धक्का बसतो
आपलाच अंश आपल्यालाच विसरतो तेव्हा
आपल्याच घराचे हे लहानसे पिलू
मोठे होऊन कधी कधी गिधाड का बनते?
बोचकून घेतात मन
क्षीण पडते तेव्हा तन
ज्यांना जपले फुलाप्रमाणे
ओझे झालो मनाप्रमाणे
फांदीला फुलं कधीच भारी नसतात
पण फुलांना फांदी का अवघड वाटते?
का अवघड वाटते?
तर नाते म्हणजे नातेच असते
आजचे नाते असेच असते
असेच असते!



– **रवींद्र केवळ बच्छाव**
एम. ए. बी. एड.



# आठवण तुझी

चांदण्या रात्री अल्लड रात्री, प्रीत तुझी स्मरत राहतो
ओठ गुलाबी कमल नयन तुझे, प्रतिक्षण आठवत राहतो
स्वप्नसुंदरी तू माझी, नभांगणातील नक्षत्र चमकत राहते
उजाड जीवनाच्या हृदय मंदिरात, तू हरक्षण बहरत राहते
श्वासात तू, हृदयात तू, स्वप्नात तूच तळमळत राहते
तुझ्या विरहाने रात्र वैरीण होऊन, मला छळत राहते
तू भावे प्रिय जीवन माझे, चांदण्यात गीत व्हावे
प्रखर चांदण्यात तुझी - माझी, प्रीत हृदयाचे गीत व्हावे

**— फुलचंद चंद्रभान ढाकणे**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# तळमळतो मी

पौर्णिमेचं टिपूर चांदणे, आसमंतात गारवा
ये! प्रिये सत्त्वरी, गाऊ आपण प्रीत मारवा
गंगाजळासम प्रीत तुझी, बागेत बहरला गुलाब लाल जसा
विरहाने तुझ्या अश्रूंना सांग बांध घालू कसा?
मन जुळती प्रेमशब्दाने, तन जुळते आपुले विरहाने
पौर्णिमेच्या रात्री गाऊ, कसा मी प्रेमाचे तराणे
स्मरत राहतो प्रेमरंग, आठवत राहतो गतक्षण
काळजात कोरून ठेवले, मी प्रिय तुझ्या आठवणीचे व्रण
ही प्रीतीची वाट अंधार घनदाट, तुला आता शोधू कसा?
तुजवीण तळमळतो मी, पाण्यावाचून तडफडे मासा जसा

**– फुलचंद चंद्रभान ढाकणे**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# आठवण

माझे होते प्रेम तुजवरी
तू नाही स्विकारलेस तरी
नाही मी हिरमुसलो त्या क्षणी
जेव्हा तू गेलीस माझे मन तोडूनी
आलीस तू परतुनी जेव्हा
सुखावले क्षणभर नयन तेव्हा
पण गेलो होतो दूर मी निघुनी
जोडले होते मन माझे दुसरीकडे
आता जरा जगू दे मला सुखांनी
विसरूनी तुझ्या आठवणी
नको येऊस परतुनी
नको येऊस परतुनी


– **नरेश चरणसिंग राठोड**
नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह



# सबब

मेंदीत हात रंगल्यावर
तुझं असं बोलणं बरं नाही
तसं तुझ्यानंतर आता
माझ्या जीवनाचंही काही खरं नाही
तुझ्या एका नकारात
आयुष्य उद्ध्वस्त करणारा सुरुंग आहे
आता मी एक कैदी अन
उर्वरित आयुष्य तुरुंग आहे
तुझ्या अंगावर आज
साडी लग्नाची नवी होती
नवं घर निवडलं म्हणून दुःख नाही
नाकारण्याची सबब मात्र
खरी हवी होती

– नरेश चरणसिंग राठोड
नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह



# सहज


चंद्रावर जाण्याची भलतीच घाई
अमेरिकेने केली रक्ताची शाई

विज्ञानाने केला बॉम्बस्फोट मोठा
माणूस झाला भलताच छोटा

पैशापुढे राहिली नाही माणसाची किंमत
दैवापुढे चालत नाही, कोणाची हिंमत

माणूस म्हणून जगण्यात राहिला नाही अर्थ
तुरुंगातील जीवनातच खरा आहे सार्थ

– **शिवाजी दत्तू पाटील**
नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह



# एका चुकीमुळे

संतापाला आवर घाला, लावा तोंडाला टाळा
एका चुकीमुळं मला, आनंद गमवावा लागला

बारीक सारीक गोष्टीत लक्ष नका देऊ
शब्दाशब्दानं वाढतं प्रकरण ऐका माझं भाऊ
पैशाच्या जीवावर नका बळं तुम्ही दाऊ
पोलिसाचं नाव घेता, एकदम पडला ढिल्ला

न्यारं, न्यारं रोज घडतं या जगात
डोळे, कान असूनी... आंधळे बहिरे होतात
विचार एक नसल्यामुळे दोघं दोहीकडे ओढतात
संतापाच्या भरात जो नाही तो इतिहास घडविला

संतापाच्या भरात घटनास्थळी थांबू नका
थांबलात तेथे तर आहे नुकसानीचा धोका
प्रकाश पंडित बंधुचं थोडं तुम्ही ऐका
संताप पळविण्याचा गमाऊ नका मोका
गावात सारा झाला बोलबोला
एका चुकीमुळे मला आनंद गमवावा लागला


**– प्रकाश तुळशीराम पंडित**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह



# जीवनाचा अर्थ

जीवनाचा अर्थ मला कारागृहात कळला...
सुखी, परिवाराचा आनंद, एका क्षणात मावळली...
कळाली किंमत मला आता पैशाची
कळाली किंमत मला आता अन्नाची
कळाली किंमत आता जगण्याची
स्वार्थी नातेवाईक फायदा घेती, पैसा लुटण्याची
निष्पाप गुन्ह्याचा कलंक इनाम मला मिळालं
दु:ख नाही मला शिक्षा झाल्याचं
दु:ख नाही मला आयुष्य बरबाद झाल्याचं
दु:ख आहे, मला आई वडिलांचं...
त्यांना सुखी न ठेवल्याचं...
ऐकून घटना माझी, सारा गाव हळहळला...
कारागृहात आहेत वेगवेगळे सेक्शन
या सेक्शनमुळे मिळते आम्हाला शिक्षण
शिक्षण घेतल्यामुळे झाले आमचे पुनर्वसन
म्हणून शासनाने नाव ठेवलं सुधारणा पुनर्वसन
प्रकाश पंडितला पाहताच वैरी मनात जळला
जीवनाचा अर्थ मला कारागृहात कळला

**– प्रकाश तुळशीराम पंडित**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह



# पत्र कारागृहातलं!

हसतं
रडतं
संतापतं
उदासतं
धास्तावतं
शब्दांचं ओझं वाहतं
खूप काही सांगत राहतं
इथलं पत्र,
पश्चातापाच्या आगीत होरपळतं
आप्तजनांच्या आठवणीनं...
पत्र... अश्रूही ढाळतं...
इथलं पत्र
बेभान होतं
बेफाम होतं
झालोच आहे बदनाम तर
पत्र... सूडाची भाषाही बोलतं...
इथलं पत्र!
पत्नीच्या विरहानं व्याकुळतं
शब्दांच्या फुलांनी शेजही सजवतं
अन्... प्रेयसीच्या आठवणीनं
रोम-रोम फुलारतं... पत्र...
ठेवलेल्या रांडेवर अविश्वास दर्शवतं
''बाहर आया तो राडा कर डालूँगा''
म्हणूनही पत्र धमकावतं
इथलं पत्र!
दसऱ्याला सोनं वाटतं

दिवाळीच्या दिव्यांनी सजतं
भाऊबीजेच्या दिवशी
बहिणीच्या आठवणीनं उदासतं
अन्... आसवांनी ओवाळणी टाकत
इथलं पत्र रडत राहतं

इथलं पत्र
जामीनचं काय झालं? विचारतं
जमिनीत यंदा काय पेरलं? हे सुद्धा विचारतं
साले को टपका के जमीन में गाड डालो
म्हणून पत्र आपल्या पंटरांना गेमही सांगतं

इथलं पत्र!
अहिंसेची भाषा बोलतं
हिंसेची भलावणही करतं
दुनिया गयी भाड मे म्हणतं
पत्र विद्रोहाची मशालही जाळतं
शब्दांचं ओझं वाहतं, कारागृहातलं
पत्र खपू काही सांगत राहतं...


इथलं पत्र!
तत्त्वज्ञान सांगतं,
अध्यात्म बोलतं,
एकूण एक धर्माच्या प्रतिमांनीही सजतं
आणि झाडून साऱ्या देवा धर्मांना
कमरेखालच्या भागावरही बसवतं

इथलं पत्र!
शांतीचं महत्त्व जाणतं
क्रांतीची भाषा करतं
मजबुरी का नाम महात्मा गांधी म्हणतं
पत्र कधी कधी वांतीही करतं

इथलं पत्र!
पत्र पाहताच पत्र द्या

म्हणून नातेवाईकांना विनवत राहतं
आशा निराशेचा ताना-बाना विणत राहतं...
बराकीच्या लोखंडी दारात बसून
बेघर झाल्याच्या वेदनेनं
पत्र घर आठवत राहतं
शब्दांचं ओझं वाहतं,
कारागृहातलं पत्रं
खूप काही सांगत राहतं
जित्याला निर्जीव करणाऱ्यांच्या वस्तीतलं
निर्जीव पत्रं सजीव होत राहतं
शब्दांचं ओझं वाहत खूप काही सांगत राहतं

– **शिवाजी वेडू साळुंके**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह



# सायरन... कारागृहातला...

धोक्याचा सायरन वाजतो तेव्हा
साने गुरुजी कक्षात पांडुरंग साने धास्तावतो
अन् विपश्यनेच्या धम्मवटीत सिद्धार्थ गौतम शहारतो!
चौकामधला मोहनचंद मूक अश्रू ढाळत राहतो...
परवा... मला तिघंजण भिशीजवळ भेटले
काय कसं काय? म्हणून मी सहज विचारलं.
क्षणभर थांबले,
आससून रडले.
गळ्यातला हुंदका दाबत
आम्हाला इथून जायचं म्हणाले.
पॅरोल, पुर्ली भरली का रजा?
म्हणून तिघांना विचारलं
पांडुरंग
सिद्धार्थ
मोहनने एका स्वरात नाकारले.
रजेचे कागद देत सहज त्यांना विचारलं
जामीनदार सदरी नाव कुणाचं लिहिलं?
कागद घेतले,
नाव वाचले... विष्णू वामन शिरवाडकर
गळ्यातला गहिवर
डोळ्यातले दहिवर
छातीतला हुंदका दाबत
त्यांना तात्या देवाघरी गेल्याचे सांगितलं.
पांडुरंग,
सिद्धार्थ
मोहन

बातमी ऐकून हबकले
कैदी-बराकीच्या पायरीवर बसून
तिघेजण हमसून हमसून रडले
धोक्याचा सायरन वाजला तेव्हा
तिघेजण मला कारागृहात भेटले...


**– शिवाजी साळुंके**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# इथे आम्ही

इथे अंधाराशी दोस्ती आमची
अन तिमिराच्या तटबंद्या असतात!
बराकी बराकीच्या झरोक्यातून
इथे कधी प्रकाशाची पिल्ले खेळतात!
आमच्या वेदना असतात जरतारी
अन व्यथा राजबिंड्या असतात!
नेत्रातून ओघळलेले उष्ण अश्रूही
आमच्या पापण्याआडून हसतात!
नियतीचे निर्घृण प्रहार झेलण्यासाठी
इथे मनाची मशागत होते!
कुणाच्या तरी अलवार आठवणीने
मात्र काळीज सशागत होते!

आम्ही असे कंगाल, बाजारात पत नाही
हारणेच वाट्याला आले, जिंकण्याची जिद्द नाही!
चोरीला गेला न चंद्र अशी कधी रात नाही
चांदण्यांचेच काय पण चंद्राचीही धडगत नाही!
आयुष्य असे भिकारी, अस्मितेची बात नाही
रुसावे कोणासाठी तरी, अशी आता साथ नाही!
कलम केलेल्या शरीरातून अंकुरतील असे हात नाही
कुरवाळतील कधी तरी, अशी आता जजबात नाही!
अशा भणंग कैफियतीची यार हो, ही रुजवात नाही
छेदून टाकील अंधाराला अशी आता बात नाही!

वाटते अजून कुठे तरी रे, हा तुझा घात नाही
आज जगायचं ते जगून घे, उद्याची ही रीत नाही!



– **शिवाजी साळुंके**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

## उपमा

मी कोण कोणाचा
येथे आलो कसा

मार्ग धरला चुकीचा
आता सुधरू कसा

स्वप्न स्वप्न माझं
याच तर कल्पनेत घालविले

भुतकालीन जीवनाचे ओझ
मर्म माझ्या मनाचे कोणी ना ताडले

रोष करतो जागोजागी
का? चा विचार केला नाही कोणी

असा मी आहे अभागी
उपमा दिली गुन्हेगाराची ज्यांनी-ज्यांनी

डोळ्यांनी दिसलं तेच तुम्ही पाहिलं
पाठचा इतिहास जाणला नाही

मन माझं कोमल
तुम्ही कधी पाहिलं नाही


कर्ता करविता तो आहे
मग आम्ही आता का?

तो वाईट आहे अशी त्यांची निंदा का?

– **दिनेश मोहन पवार**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# प्रीत

वाऱ्यावरती कुंतल नको ग सोडू
ते भुर-भुर उडतात
तुला बाहुपाशात घ्यावं
असं मला ते सांगतात
नको लाजू तू
ओठांच्या पाकळ्या,
पदराच्या आड लोपतात
हळूच येऊन चुंबन घ्यावं
असं मला ते दर्शवितात
दोन पाखरं बघ
कसे नभात विहारतात
तुझी माझी प्रीत जमली
साऱ्यांना ते सांगतात
तुझीच स्वप्नं मला
नेहमी पडतात
तू माझीच आहेस
असं मला ती सांगतात



**— दिनेश मोहन पवार**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

# रक्षाबंधन

आला-आला रक्षाबंधनाचा दिवस
आज बहीण नाही माझ्या नजरेस
आज आहे मी बंद या तुरुंगात,
परी येती फार आठवणी माझ्या या मनात

माझ्या बहिणीची माया,
आहे अतिखोल सागराहुनि या,
आजच्या या शुभ्र समया
दुःखी असेल ती बाया

माझ्या बहिणीचं मागणं
कोण पुरवील,
तिचे कोकिळवाणी बोल
कोण ऐकेल

माझ्या लाडक्या भगिनीस कोण
घेईल हो लेणं
माझं रडतंय मन

माझी बहिण आहे एकुलती
तिच्या संकटाला नाही कोणी सखा
माझ्या भगिनीची व्यथा सांगू कुणाला
तिची सारी चिंता
एकाच पांडुरंगाला

माझ्या बहिणी भिऊ नको या दुःखाशी,
राहील माझा आशिष सदैव तुझ्या पाठीशी,
आला आला बघ रक्षाबंधनाचा दिवस
कसा अभागी मी बहीण नाही नजरेस

**– परशुराम उमा मेरंदे**
नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह

# जीवन कहाणी

माझ्या बालपणाची कहाणी
कशी सांगू तुम्हास्नी?
तानुला मी वाढत होतो मातेच्या कुशीमधी,
चघळीत होतो करूंगली निज मुखामधी
तीन-चार वर्षांच्या त्या कोवळ्या वयात,
खेळत-बागडत रंगलो मी गोट्या कवड्यात
कोण जाणे आले कसे? माय बापाच्या मनात,
टाकले त्यांनी मला जेव्हा शाळंत
शाळा शिकत शिकत
मला लागली कूसंगत
सुटली माझी शाळा, लागलो मी कामा,
झालं होतं लगीन, परी गेलो मी वाया
नाही सुखी करू शकलो मी माझा संसार,
वागलो बेफाम, पुढचा नाही केला मी विचार
अज्ञानाच्या त्या भरात, आलो मी जेलात,
भ्रम आता दूर झाला, प्रकाश पडला मस्तकात

**– परशुराम उमा मेरंदे**
नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह

कविता ही एक संवेदनाच असते.
माणूस कुठेही असला तरी
ती त्याच्या हृदयात वास करत असते.
संवेदनेला जे शब्दबद्ध करतात ते कवी होतात.
असे कवी समाजात सर्वत्र आणि तुरुंगातही असतात.
तुरुंगात गुन्हेगार म्हणून गेलेला एखादा माणूस
गजाआड राहून स्वत:ला,
स्वत:च्या पूर्वायुष्याला तपासायला लागतो.
गजांना साक्षी ठेवून तो शब्दांची मांडणी करतो.
त्यातून जन्माला येते एक आगळी-वेगळी कविता.
वेगळ्या भावविश्वात नेणारी कविता
आणि खरं सांगायचं तर
गजाआडची कविता.

गजाआड असलेल्या आणि दुभंगलेल्या
काळजात डोकावण्याचा एक अल्पसा प्रयत्न

